सत्यमेव जयते

# महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण
Maharashtra Water Resources Regulatory Authority

**विस्तृत जाहिरात**

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण**

**9 व 11 वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर-1, कफ परेड, मुंबई - 400005**

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,मुंबई कार्यालयातील खालील रिक्त पदे कंत्राटी पध्दतीने भरण्यासाठी पात्र उमेदवारांकडून दिनांक 31 ऑगस्ट, 2018 पर्यंत वरील पत्त्यावर प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रतींसह अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदभरतीबाबतचे पात्रता निकष आणि अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पदाचे नांव | पदसंख्या | दरमहा ठोक पारिश्रमिक (अंदाजे) (रुपये) |
|---|---|---|---|
| 1 | सचिव | 1 | 1,42,570/- |
| 2 | उपसंचालक | 2 | 70,900/- |
| | एकूण पदे | 3 | |

**टीप :** उमेदवाराची गुणवत्ता व पदासाठीचा अनुभव लक्षात घेऊन त्याचे ठोक पारिश्रमिक कमी/जास्त करण्याचे अधिकार प्राधिकरणास राहतील.

**पदांसाठीचे पात्रता निकष आणि अटी व शर्ती :**

1. **सचिव -** या पदावरील नियुक्ती ही एकतर --
   (1) शासकीय विभागातून प्रतिनियुक्तीने,
   किंवा
   (2) पूर्ण वेळ कंत्राटी तत्वावर करण्यात येईल.

**शैक्षणिक अर्हता** - पदवीधर, पदव्युत्तर पदवीकाधारकास प्राधान्य.

**अनुभव** -(क) प्रशासन व विकास/पाटबंधारे अभियांत्रिकी क्षेत्रातील किमान 20 वर्षाचा अनुभव.
(ख) ज्या व्यक्तीने मुख्य अभियंता / सहसचिव किंवा सचिव स्तरावर काम केले असेल आणि ज्याला जलक्षेत्रातील अनुभव असेल अशा व्यक्तीस प्राधान्य.

**वय** -- कंत्राटी तत्वावरील व्यक्तीचे वय नियुक्तीच्या वेळी 61 वर्षा पेक्षा अधिक असणार नाही, आणि तो वयाच्या 65 वर्षापर्यंत पद धारण करु शकेल.

----------

2. उप संचालक - उपसंचालक (हक्कदारी)/(अंमलबजावणी व विनियम) या पदावरील नियुक्ती ही एक तर ---
   (1) नियमित तत्वावर,

किंवा

(2) शासकीय विभागातून प्रतिनियुक्तीने,

किंवा

(3) पूर्ण वेळ कंत्राटी तत्वावर,

(4) (नियमित कर्मचाऱ्यांसाठी) पदोन्तीने करण्यात येईल

**शैक्षणिक अर्हता** - (क) स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदवीधर

**अनुभव** -- (क) **कंत्राटी तत्वावर / प्रतिनियुक्ती,--**

(एक) ज्या व्यक्तीने प्राधिकरणामध्ये किमान 5 वर्षाच्या कालावधीसाठी सहायक संचालक म्हणून काम केले असेल,

किंवा,

सहायक कार्यकारी अभियंता किंवा त्याच्याशी समतुल्य श्रेणीतील कामाचा 3 वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव / किंवा सहायक अभियंता श्रेणी - 1 किंवा त्याच्याशी समतुल्य पदावरील कामाचा 7 वर्षापेक्षा कमी नसेल, इतका अनुभव किंवा सहायक अभियंता श्रेणी - 2 किंवा त्याच्याशी समतुल्य श्रेणीतील कामाचा /जलसंपदा विकास व शासनाच्या /खाजगी संस्थांच्या / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या / महामंडळांच्या व्यवस्थापन या कोणत्याही क्षेत्रातील कामाचा 10 वर्षापेक्षा कमी नसेल इतका अनुभव असेल.

(दोन) स्थापत्य अभियांत्रिकी /पर्यावरण अभियांत्रिकी यामधील पदव्युत्तर पदवीधारकांसाठी/डॉक्टरेट धारकांसाठी कंत्राटी नियुक्तीच्या बाबतीत 4 वर्षाचा अनुभव असेल.

(तीन) संगणक हाताळणीबाबतचे पुरेसे ज्ञान आवश्यक.

(चार) मराठी व इंग्रजी भाषेतील निपुणता आवश्यक.

**(ख) पदोन्नतीकरिता** - ज्या व्यक्तीने प्राधिकरणात किमान 5 वर्षाच्या कालावधीसाठी सहायक संचालक म्हणून काम केले आहे.

वय कंत्राटी तत्वावरील व्यक्तीचे वय नियुक्तीच्या वेळी 61 वर्षा पेक्षा अधिक असणार नाही, आणि तो वयाच्या 65 वर्षापर्यंत पद धारण करु शकेल.

----------------

टीप -1) वरील अनुक्रमांक 1 आणि 2 येथील पदांसाठी, अटींची पुर्तता करणाऱ्या उमेदवारांची मुलाखतीद्वारे निवड करण्यात येईल.

2) योग्य उमेदवार प्राप्त झाल्यास प्रत्येक पदासाठी (1:3) प्रमाणात निवडसूची तयार करण्याचे अधिकार प्राधिकरणास राहतील.

दिनांक : 23 जुलै, 2018

रजिस्ट्रार,

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई